# आरटीई.25% ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया सन 2021-22

## प्रवेशअर्ज भरण्याकरीता पालकांसाठी मार्गदर्शक सूचना:-

1) शासनाने सन 2021-22 या वर्षासाठी ठरवून दिलेल्या कालावधीमध्येच ऑनलाईन अर्ज करता येईल.

2) पालकांना ऑनलाईन प्रवेश अर्ज एकदाच भरता येईल.

3) **rte25admission.maharashtra.gov.in** किंवा **http://student.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर वेबसाईटवर जावून आर.टी.ई.पोर्टलवर ऑनलाईन अर्ज पालकांनी भरावयाचा आहे.

4) आरटीई करीता स्वतंत्र मोबाईल ॲप उपलब्ध आहे.कोणत्याही android मोबाईलवर इंटरनेटची सुविधा असल्यास अर्ज भरता येतो.

5) मदत केंद्रावर किंवा जेथे इंटरनेट सुविधा,संगणक,प्रिंटर इत्यादी उपलब्ध असेल तेथून किंवा मोबाईलवर rte चेApp Download करुन ऑनलाईन अर्ज भरावा.

6) ऑनलाईन अर्ज भरताना कोणतेही कागदपत्रे अपलोड करावयाची नाहीत.मात्र अ)रहिवासीचा पत्ता लिहीण्यासाठी रहिवासीचा पुरावा लिहावा (रहिवासी पुराव्यातील पत्ता अर्जावर लिहावा)

ब)बालकाचे जन्म दिनांकाची नोंद करण्यासाठी जन्म दाखला.

क)बालक वंचित घटकातील असल्यास जातीची नोंद करण्यासाठी जातीचे प्रमाणपत्र.

ड)बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकांच्या वडिलांचा उत्पन्नाचा दाखला (सन 2019-20/2020-21)

7) प्रवेश अर्ज शैक्षणिक वर्ष सन 2021-22 ची 25% ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे अर्ज मोफत स्वरुपात संकेतस्थळावर उपलब्ध असून,संकेतस्थळावर किंवा मोबाईलवर भरावयाचा आहे.

8) पालक घरापासून 1किमी व 3किमी आणि अधिक अंतरापर्यंतच्या उपलब्ध असणाऱ्या फक्त 10 शाळा तसेच सर्व माध्यमातून माध्यम निवडण्याचे स्वातंत्र्य पालकांना राहील.

9)1कि.मी,3कि.मी.अंतरावरील रहिवासी अर्ज करु शकतात.शाळेपासून 3 कि.मी. पर्यंतच्या परिसरातील रहिवासी अर्ज करु शकतात मात्र शाळेपासून 1 कि.मी. परिसरातील अर्जदाराना नियमाने प्राधान्य मिळेल.1कि.मी. परिसरातील पुरेशा क्षमतेइतकी बालके उपलब्ध न झाल्यासच 3 कि.मी. आणि त्यापेक्षा अधिक अंतराच्या परिसरातील बालके संबंधित शाळेत प्रवेशास पात्र होतील.मात्र 3कि.मी.पेक्षा अधिक अंतराच्या शाळेकरीता लॉटरी लागली तर त्यावेळेस विद्यार्थ्यांच्या वाहतुकीचा खर्च संबंधित पालकांस करावा लागेल.

10) शाळेच्या आरंभीच्या वर्गाच्या 25% प्रवेश क्षमतेपेक्षा **जास्त अर्ज प्राप्त झाल्यास सोडत/लॉटरी पध्दतीने प्रवेश दिले जातील.अशा परिस्थितीत प्रत्येक अर्जदाराच्या पाल्याला प्रवेश मिळलेच असे नाही.**

11) अनुसूचित जाती जमातीसाठी जन्माचा दाखला,जातीचे प्रमाणपत्र (पिता/बालक) रहिवासी पुरावा (आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र/वीजबील/टेलिफोन बील/पाणीपट्टी/घरपट्टी/वाहन चालविण्याचा परवाना/भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत/प्रॉपर्टी टॅक्स देयक/गॅसबुक/बँक पासबुक/ड्रायव्हिंग लायसन्स/रेशनिंग कार्ड यापैकी कोणतेही एक) आवश्यक आहेत.

12) सर्व जाती धर्मातील (विकलांग)दिव्यांग बालके प्रवेशास पात्र दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र 40% पेक्षा अधिक असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा वैद्यकीय अधीक्षक यांचे प्रमाणपत्र,जन्माचा दाखला,रहिवासी पुरावा (आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र/वीजबील/टेलिफोन बील/पाणीपट्टी/घरपट्टी/वाहन चालविण्याचा परवाना/भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत/प्रॉपर्टी टॅक्स देयक/गॅस,बॅक पासबुक/ड्रायव्हिंग लायसन्स/रेशनिंग कार्ड यापैकी कोणतेही एक)

13) घटस्फोटीत महिलांच्या बाबतीत न्यायालयाचा निर्णय,घटस्फोटीत महिलेचा/बालकांच्या आईचा रहिवासी पुरावा.

बालक वंचित गटातील असल्यास बालकांचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

14) न्यायप्रविष्ट असलेल्या घटस्फोटाप्रकरणातील महिलांच्या बालकांसाठी घटस्फोटाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा पुरावा,घटस्फोट प्रकरण न्यायप्रविष्ट असलेल्या महिलेचा/बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा

बालक वंचित गटातील असल्यास बालकांचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

15) विधवा महिलेल्या बालकांसाठी पतीचे मृत्युपत्र,विधवा महिलेचा/बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.

बालक वंचित गटातील असल्यास बालकांचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.

16) अनाथ बालकांसाठी अनाथालयाची कागदपत्रे ग्राहय धरण्यात यावीत,तसेच बालक अनाथालयात राहत नसेल जे पालक त्याचा सांभाळ करतात त्यांचे हमीपत्र आवश्यक राहील.

17) खुला प्रवर्ग,अल्पसंख्याक (मुस्लिम,बौध्द,ख्रिश्चन,पारस,जैन व शीख)यांना प्रवेशासाठी जन्माचा दाखला,रहिवासी पुरावा,(आधारकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र/वीजबील/टेलिफोन बील/पाणीपट्टी/घरपट्टी/वाहन चालविण्याचा परवाना/भाडेतत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत/प्रॉपर्टी टॅक्स देयक/गॅस बुक/बँक पासबुक/ड्रायव्हींग लायसन्स/रेशनिंग कार्ड यापैकी कोणतेही एक) व कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.1,00,000/-(एक लाख) पेक्षा कमी असल्याचा उत्पन्नाचा दाखला.उत्पन्नाच्या दाखल्याकरीता Salary Slip तहसिलदारांचा दाखला,कंपनीचा किंवा Employer चा दाखला.

18) जन्माचा दाखला :-जेथे जन्म व मृत्यु अधिनियम 1969(1969 चा 18)अन्वये जन्माचा दाखला उपलब्ध नसेल तेथे पुढील दस्तऐवजांपैकी कोणताही एक दस्तऐवज हा शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी बालकाच्या वयाचा पुरावा असल्याचे मानण्यात येईल.

अ)बालकाच्या जन्म ठिकाणच्या संबंधत किंवा सहाय्यकारी परिचारीका व प्रसविका यांनी केलेली नोंद किंवा ठेवलेला अभिलेख •

आ)अंगणवाडी अभिलेख

ई)हा अभिलेख उपलब्ध नसेल तर वंचितगटातील तसेच दुर्बल घटकांतील बालकांच्या बाबतीत जन्मदिनांक नमूद करणारे बालकाच्या एकतर मातेचे किंवा पित्याचे प्रमाणपत्र,गावच्या सरपंचाने किंवा स्थानिक शाळेच्या मुख्याध्यापकांने किंवा शहरी वा निमशहरी क्षेत्राच्या बाबतीत शासनाने या संबंधित अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले आई-वडिलांचे किंवा पालकांचे बालकाच्या वयाचे प्रतिज्ञापत्र.

19) जातीचा दाखला हा उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी हे प्राधिकृत आहेत.परराज्यातील जातीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

20)गुगलच्या नकाशात आपल्या स्वत:च्या घराचे स्थान निश्चित करताना रहिवासी पुराव्यातील पत्ता पाहूनच नकाशात स्थान निश्चित करावे.Google Map Location वर अर्जदाराच्या राहत्या घराचे अचूक ठिकाण निवडून बलून राहत्या घरावरच दर्शवावा.जिथपर्यंत आपल्या निवासाच्या घरावर बलून दिसत नाही तिथपर्यंत अर्ज Submit करु नये,इतर ठिकाणी दाखविल्यास तो अर्ज चूकीची धरला जाईल व प्रवेश रद्य करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

21)पालक गुगलमॅपवर अचूक नोंद करण्यासाठी गुगल प्ले स्टोअरमध्ये Latitude व Longitude मोजण्यासाठी अनेक ॲप फोनवर उपलब्ध आहेत.

अ)My current location

ब)Sea level

क)Address 2 lat.lon.

ड)Latitude and Longitude

ई)Latitude coordinates

फ)Gpslat long viewer

ग)Latitude tracker

एच)Latitude and Longitude match.

आय)Gps coordinates.

**22)काही NGO पालकांचे अर्ज भरुन देतात त्यामध्ये पाल्याचे निवासाचे स्थान (Location) जाणीवपूर्वक शाळेच्या जवळ दाखवतात/चुकीचे भरले जातात अशा संस्थाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्या संस्थेवर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**

**23)मा.महाराष्ट्र शासन यांचेकडील आरटीई2020/प्रक्र.220/एस.डी-1 दिनांक 21/9/2020 रोजीच्या पत्रान्वये,आरटीई 25% प्रवेशप्रक्रियेअंतर्गत रहिवासीचा पुरावा म्हणून भाडेकरार हा फॉर्म भरण्याच्या दिनांकापूर्वीचा असावा व त्याचा कालावधी 1 वर्षाचा असावा.भाडेकरार सादर करणाऱ्या पालकांच्या रहिवासाबाबत क्षेत्रीय अधिकारी हे वर्षभरात केव्हाही तपासणी करतील,सदरील तपासणी केल्यानंतर पालक हा भाडेकरार केलेल्या ठिकाणी राहत नसल्याचे दिसून आल्यास पालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.व त्यांच्या विद्यार्थ्यांची फीची प्रतिपूर्ती शासन देणार नाही.त्या पालकाला संबंधित शाळेची सर्व फी देणे बंधनकारक राहील.**

उपरोक्त बाबी संबंधित पालकांनी काटेकोरपणे पाहून ऑनलाईन अर्ज भरावा.

10.02.24

**(कादर शेख)**
**प्रशासनाधिकारी**
**मनपा.प्राथमिक शिक्षण मंडळ,सोलापूर.**

जाक्र.प्राशिमं,/आस्था-3/ /2020-21
मनपा.प्राथमिक शिक्षण मंडळ,सोलापूर.
दिनांक:- 10/02/2021.

प्रति,

मा.संगणक प्रमुख,
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर.

उपरोक्त 25% ऑनलाईन प्रवेशप्रकियेची माहिती आपल्या सोलापूर महानगरपालिका वेबसाईटवर प्रसिध्द करावे.

(कादर शेख)
प्रशासनाधिकारी
मनपा.प्राथमिक शिक्षण मंडळ,सोलापूर.

मा.आयुक्त,सोलापूर महानगरपालिका,सोलापूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

8Press note